क्रमांक : ८७६६ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : ९६ मार्च, २०२६.

**:: कार्यालयीन आदेश ::**

महाराष्ट्र शासनाने प्रशासनातील कार्यपध्दती अधिक पारदर्शक, कार्यक्षम व डिजिटल करण्याच्या उद्देशाने ई-गव्हर्नन्स उपक्रमांतर्गत शासकीय कर्मचाऱ्यांचे वार्षिक गोपीनय अहवाल ऑनलाईन भरण्यासाठी **"महापार" (MahaPAR)** प्रणाली तसेच सेवा पुस्तके डिजिटल स्वरुपात ठेवण्यासाठी **"महाआस्था" (e-HRMS/Service Book)** प्रणाली विकसित केलेली आहे.

या संदर्भात शासनाच्या दिनांक ७ फेब्रुवारी २०१८ व दिनांक २० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर प्रणाली या सचिवालयात प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी **"महापार" (MahaPAR)** या प्रणालीसाठी श्री. सचिन ढवळ, डेटा ऑपरेटर व **"महाआस्था" (e-HRMS/Service Book)** प्रणालीसाठी श्री.देवेंद्र पाटील, संगणक अभियंता यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

नियुक्त नोडल अधिकारी खालील कामकाज पाहतील :–

१. "महापार" व "महाआस्था" प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी समन्वय करणे.

२. संबंधित कर्मचाऱ्यांचे User ID/ Login तयार करण्याबाबत कार्यवाही करणे.

३. अहवालाचे डिजिटल लेखन करण्यासाठी (स्वयंमुल्याकन, प्रतिवेदन व पुर्नविलोकन) यांचा आलेख सुनिश्चित करणे.

४. कर्मचाऱ्यांच्या सेवा नोंदी व इतर माहिती प्रणालीमध्ये अद्ययावत ठेवण्याची देखरेख करणे.

५. NIC किंवा संबंधित तांत्रिक संस्थेशी आवश्यक ते समन्वय राखणे.

६. प्रणाली वापराबाबत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणे.

७. प्रणातील त्रुटी/तांत्रिक अडचणी याबाबत वरिष्ठांना अहवाल देणे.

८. प्रणालीशी संबंधित अभिलेख व अहवाल अद्ययावत ठेवणे.

आदेशानुसार,

(स्वाक्षरी)
**(घ.ज्ञा.देबडवार)**
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

१. श्री.सचिन ढवळ, डेटा ऑपरेटर

२. श्री.देवेंद्र पाटील, संगणक अभियंता

**प्रतिलिपी :**

१. मा.सचिव (१) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

२. मा.सचिव (२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

३. मा.सचिव (३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

४. मा.सचिव (४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५. पध्दती विश्लेषक (श्री.सर्वणकर), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

६. 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७. वैयक्तिक नस्ती.

८. निवडनस्ती .